Io प्रत

DO:- ASI / [illegible] (51)
IO: PI / श्री [illegible]
ने. ला. प्र. वि छत्रपती संभाजीनगर

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर — **P.S.(ठाणे):** एम.आई.डी.सी. वाळूंज

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0419 — **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/05/2024 18:18

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 01/05/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/05/2024

**Time From (वेळेपासून):** 12:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/05/2024 — **Time (वेळ):** 17:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 040

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/05/2024 18:07 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 4 किमी — **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** MSEB कार्यालय, वाळूज 2

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** भगवान बिभीषण गाढवे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हनुमान मंदीराजवळ, बजाजनगर,एम.आई.डी.सी. वाळूंज,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | हनुमान मंदीराजवळ, बजाजनगर,एम.आई.डी.सी. वाळूंज,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शेख रफिक शेख मोहंम्मद | | | 1. बायजीपुरा गल्ली नं-09,चाऊस मश्जित जवळ ,एम.आई.डी.सी. वाळूंज,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
फिर्याद

कॅम्प- ला.प्र.वि. कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर

दिनांक 01/05/2024

मी भगवान बिभीषण गाढवे, वय 39 वर्षे, व्यवसाय सिमेंट ब्लॉक बनविणे, रा. हनुमान मंदीराजवळ, बजाजनगर, MIDC, पंढरपुर ता.जि. छत्रपती संभाजीनगर, मो.क्र. 9766280400.

मी दिनांक 15/04/2024 रोजी MIDC, C विभाग, वाळूज, छत्रपती संभाजीनगर येथे सुरक्षित ठिकाणी हजर येवून अमोल धस, पोलिस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर तक्रार दिली की, " मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहतो. मी सर्व्हे नं. 58, प्लॉट नं. 12, साजापूर येथे रिकामा प्लॉट व्यवसाय टाकण्याकरीता सौ. अरुणा अरविंद पाटील रा. नागेश्वरवाडी, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून भाडे तत्वावर घेतला आहे. सदर प्लॉटवर मला लाईटची आवश्यकता असल्याने दिनांक 12/04/2024 रोजी मी व्यावसाईक लाईट कोटेशन घेण्याकरीता चौकशी करण्यासाठी MIDC मधील MSEB कार्यालयात गेलो होतो. तेथे मी चौकशी करत असतांना तेथे हजर असलेले लाईनमन यांनी मला जागेचा सर्व्हे झाल्यावर कोटेशन मिळते व त्यानंतर मिटर दिले जाते असे सांगितले. व व्यावसाईक कोटेशन काढून मिटर बसवण्यासाठी सात हजार रूपये लागतील असे सांगितले. चौकशी दरम्यान लाईनमन यांचे नाव शेख रफिक असे असल्याचे मला समजले. त्यामुळे मी दिनांक 12/04/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोर्टलवर ऑनलाईन तक्रार केली आहे. तसेच मी दिनांक 14/04/2024 रोजी व्यावसाईक कोटेशन मिळणेकरीता ऑनलाईन अर्ज केलेला आहे, " वगैरे मजकुराचे तक्रार दिली."

मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 15/04/2024 रोजी शेख रफिक हे माझ्याकडे माझे कामासंदर्भाने लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत मला व पंच क्रमांक 1 श्री. कुंटे यांना शेख रफिक यांचेकडे MSEB कार्यालय, वाळूज 2 येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. पोनि/धस यांनी मला व पंचाना व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवुन लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना दिल्या. व्हाईस रेकॉर्डर माझे बनियनचे डावे बाजुस सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्र. 1 श्री. कुंटे यांना रफिक शेख यांचेकडे MSEB कार्यालय, वाळूज 2 येथे पाठवले. मी व पंच क्रमांक 1 असे त्याठिकाणी गेलो तेथे माझी व रफिक शेख यांची भेट होऊन आमचेत चर्चा झाली. त्यानंतर लोकसेवक श्री शेख रफीक यांनी मी नंतर फोन करुन तुम्हाला सांगतो असे सांगितले. त्यांनी माझ्याकडे पैशाची मागणी केली नाही. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 असे शासकीय वाहन थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी परत आलोत. मी लोकसेवक श्री. शेख रफीक यांचे विरुध्दची लाचमागणी पडताळणी कारवाई लोकसेवक नंतर करणेची विनंती केली. मी दिनांक 16/04/2024 रोजी रफिक शेख यांना फोन केला असता त्यांनी ते बाहेर असल्याचे सांगितले. दिनांक 18/04/2024 रोजी मी फोन केल्यावर रफिक शेख यांनी मला उदया सकाळी जागेचा सर्व्हे करणार आहेत असे सांगितले. जागेचा सर्व्हे झाल्यावर दिनांक 20/04/2024 रोजी मी रफिक शेख यांना फोन करून मीटर बाबत विचारले असता त्यांनी मला दिनांक 21/04/2024 रोजी भेटायला बोलावलेने मी पोनि धस यांना कारवाई करण्यासाठी बोलावले. दिनांक 21/04/2024 रोजी सुरक्षित ठिकाणवरून मला व पंच क्र. 1 कुंटे यांना रफिक शेख यांचेकडे MSEB कार्यालय, वाळूज 2 येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. पोह/वाघ यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे गळयात सुरक्षीत घालून व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्र.1 श्री. कुंटे यांना रफिक शेख यांचेकडे MSEB कार्यालय, वाळूज 2 येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी केली असता, माझी व रफिक शेख यांची MSEB कार्यालय, वाळूज 2 येथे भेट झाली. त्याठिकाणी आमचेत चर्चा झाली चर्चेदरम्यान रफिक शेख यांना "काल कोटेशन भरले आहे, लाईट जोडून दया, तुमचे काय असेल बाकीचे ते करून टाकतो," असे मी म्हणालो. त्यावर रफिक शेख यांनी "पाच दो.. पाच हजार," असे म्हणालेवर मी "पाच हजार !" असे बोललो तेव्हा रफिक शेख यांनी "हो" असे म्हणाले, तेव्हा मी

बरं चालतयं, दहा मिनीटांत घेवून येतो, असे बोलल्यावर लोकसेवक यांनी "ठिक है" असे म्हणाले. रफिक शेख यांनी 5000/- रूपयांची मागणी करून लागलीच लाच रक्कम स्वत: स्विकारण्याचे मान्य केलेने त्यांचेविरुध्द सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले

पोनि/धस यांनी रफिक शेख यांचेविरुध्द लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगुन सापळा कारवाईसाठी ॲन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे सांगुन त्याबाबत मला व पंचाना माहिती देऊन प्रात्यक्षिक करुन दाखवुन सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पथक, पंच व मला सुचना दिल्या. रफिक शेख यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर सापळा पथकातील अधिकारी/अंमलदार यांना दिसेल अशा दर्शनी ठिकाणी येवुन डोक्याला बांधलेला पांढरा मोठा गमचा सोडून डावे हातात घ्यावा असा ईशारा नेमुन दिला.

त्यानंतर पोह/वाघ यांनी व्हॉईस रेकॉर्डर माझे गळयात सुरक्षीत घालून व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्रमांक 1 कुंटे यांना MSEB कार्यालय, वाळूज 2 येथे पाठवुन लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन केले असता, मी व पंच MSEB कार्यालय, वाळूज 2 येथे गेलो असता तेथे रफिक शेख भेटले नाही. तेथे त्यांचेबाबत विचारणा केली असता ते साईटवर गेल्याचे सांगितले. त्यामुळे रफिक शेख यांची भेट न झाल्याने त्यांनी माझ्याकडुन पैसे स्विकारले नाहीत त्यामुळे त्यांचेविरुध्द नंतर लाचेच्या सापळ्याचे आयोजन करावे अशी विनंती केली. त्याबाबत दिनांक 21/04/2024 रोजी सविस्तर पंचनामा केला आहे.

त्यानंतर मी दिनांक 30/04/2024 रोजी पोनि/धस यांना आज दिनांक 01/05/2024 रोजी MIDC वाळूज येथे येवुन कारवाई करण्याची विनंती केली होती.

आज दिनांक 01/05/2024 रोजी पोनि/धस हे पंच व स्टाफसह खजगी वाहनाने सम्राट चौक, MIDC, वाळूज येथे हजर आले व रफिक शेख यांचेविरुध्द लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगुन माझा व पंचांचा आपसी परिचय करुन देऊन सापळा कारवाईचे अनुषंगाने पंचांना सविस्तर माहिती दिली. त्यानंतर पोनि/धस यांनी मला व पंचांना सापळापुर्व कारवाई दरम्यान दिलेल्या सुचनांची उजळणी करुन देऊन लाच रक्कम 5000/-रु. माझे अंगावरील पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवली. पोअं/हिवाळे यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे गळयात सुरक्षीत घालून मला व पंच क्रमांक 1 श्री. कुंटे यांना रफिक शेख यांचेकडे MSEB कार्यालय, वाळूज 2 येथे पाठवुन लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन केले असता, माझी व रफिक शेख यांची MSEB कार्यालय, वाळूज 2 येथे भेट झाली त्याठिकाणी आमचेत झालेल्या चर्चेदरम्यान रफिक शेख यांनी मला त्यांचे उजवे हाताचा अंगठा व त्या शेजारील बोट एकमेकांवर घासून पैसे देण्याबाबत इशारा केलेने मी माझे उजवे हाताने पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशातुन लाच रक्कम 5,000/- रुपये बाहेर काढून रफिक शेख यांचे समोर धरली असता त्यांनी ती उजव्या हाताने स्विकारून त्यांचे अंगावरील परीधान केलेले काळे रंगाचे सफारी शर्टच्या डावे बाजूचे खिशात ठेवले. त्यानंतर मी लाच स्विकारल्यानंतर करावयाचा नेमुन दिलेला पुर्वनियोजीत इशारा 13.09 वा.केला. मी इशारा करताच रफिक शेख यांना माझा संशय आल्याने त्यांनी त्यांचे खिशात ठेवलेली लाच रक्कम काढून खाली फेकली. व बाहेर जावून निघून जायला लागले.

इशारा प्राप्त होताच पोनि/धस, सापळा पथकातील सदस्य व पंच क्रमांक 2 असे MSEB कार्यालय, वाळूज 2 चे समोर आमचेजवळ आले. पोअं/हिवाळे यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. पोनि/धस यांनी रफिक शेख यांना त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. पोनि/धस यांनी पंच क्र.1 श्री कुंटे यांना पंच क्र.2 श्री. शिंदे यांचे समक्ष विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्र.1 श्री. कुंटे यांनी सांगितले की," रफिक शेख यांनी माझ्याकडे हाताचे इशाऱ्याने लाचेची मागणी करुन लाच रक्कम 5000/-रु. स्विकारून त्यांचे अंगावरील परीधान केलेले काळे रंगाचे सफारी शर्टच्या डावे बाजूचे खिशात ठेवले. व तक्रादार यांनी इशारा करताच रफिक शेख यांना संशय आल्याने त्यांनी त्यांचे खिशात ठेवलेली लाच रक्कम काढून खाली फेकली. व बाहेर जावून निघून जायला लागले. " असा खुलासा पंच क्र.1 यांनी केला.

पोनि/धस यांनी रफिक शेख यांना त्यांचे नाव गाव विचारले असता, त्यांनी शेख रफिक शेख मोहम्मद, वय-42 वर्ष, व्यवसाय-नौकरी, प्रधान तंत्रज्ञ, MSEB कार्यालय, वाळूज 2 छत्रपती संभाजीनगर, रा. बायजीपुरा, गल्ली नं. 9, चाऊस मश्चिदजवळ, सेंट्रल नाका, छत्रपती संभाजीनगर (वर्ग-3) असे सांगीतले. पोनि/धस यांनी रफिक शेख यांना लाच रकमे बाबत विचारणा केली असता, रफिक शेख यांनी लाच रक्कम कर्यालयात फरशीवर पडल्याचे सांगितलेने पोनि/धस यांनी रफिक शेख, पंच व सापळा पथकासह कार्यालयात जावून सदरची लाच रक्कम पंच क्रमांक 2 श्री. शिंदे यांना त्यांचे ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगीतले. पंच क्रमाक 1 यांनी सापळापुर्व कारवाईचा पंचनामा मधील नोटांचे क्रमांक वाचुन दाखवले. त्यावर पंच क्रमांक 2 श्री. शिंदे यांनी लाचेच्या नोटांची खात्री करुन सापळापुर्व

पंचनाम्यातील नोटांशी तंतोतंत मिळुन आल्याचे कळवले. पोनि/धस यांनी सदरच्या नोटा पंच क्रमांक 2 श्री. शिंदे यांना ताब्यात ठेवण्यास सांगीतल्या. पोनि/धस यांनी घटनास्थळावर प्राथमीक कारवाई केली. पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात येईल असे कळवुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे हजर आलोत. त्याबाबत दिनांक 01/05/2024 रोजी सविस्तर यशस्वी सापळा कारवाईचा पंचनामा केला आहे.
तरी रफिक शेख यांनी दिनांक 21/04/2024 रोजी माझे विदयुत मिटर बसवून देण्यासाठी 5,000/-रु. लाचेची मागणी करुन 5,000/-रु. लाच रक्कम स्वत: स्विकारण्याचे मान्य करुन आज दिनांक 01/05/2024 रोजी 13.09 वा. लाच रक्कम 5,000/-रु. MSEB कार्यालय, वाळूज 2 येथे पंचासमक्ष स्विकारली असता, रफिक शेख यांना लाचेच्या रकमेसह पकडले म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर वाचुन पाहिली ती बरोबर खरी आहे.
समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

Kishor Laxman Ghusale

**Rank** (पद): HC (Head Constable) **No.**(क्र.): 1048

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** Krushnachandra kes
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):** POBN74603

ASI
(जी. टान. कडू)
ब.नं. 583
पो.ठा. MIDC वाळूज,
छत्रपती संभाजीनगर.